| वेदमूर्ती कसबे मजकूर | | राजश्री गणेश माहादेव हवालदार |
| --- | --- | --- |
| अवधूतभट धर्मादिकारणी | सिवरामभट धर्मादिकारणी | तां चिपुळीण |
| हरजोसी गोंद-जोसी | अनंतभट मंत्र-भट | राजश्री रामजी पंताजी मजमदार ता मजकूर |
| विश्वनाथभट पटवर्धन | | |

**देसक मामले मजकूर**

| | | |
| --- | --- | --- |
| राजश्री बालाजी विश्वनाथ देशमुख मामले दंडाराजपुर प्रांत सीवर्धन | रंगोवा नायक सरदेसाई | खंडो आबाजी जानीब खंडो ब- |

राजश्री उधाजी भागवत
राजश्री सताजी भागवत
देवजी भागवत
जोत्याजी चवाण
जैताजी रणनवरे
राणोजी वागचवरे पाटील

**मौजे आलगाऊ तां वरेई**

मळजी गावडे गौड वस्ती
राजीवळी तां फलटण
बावाजी होणमणे वस्ती
तराडगाव तां फलटण
सखोजी राजपुरे पाटील

**मौजे मणरबड तां वाई**

कासोजी गाजरे पाटील
मौजे पारनेर प्रांत जुनेर
सुभानजी रणनवरे पाटील
राळा परगणे समत सासवड
संताजी सिंदे
शामजी कायदेव वावरे
पाटील कसबे कुडाल
विष्णु आबाजी

**मुकासाई**

अंताजीराव ऐढावकर
संभाजीराव पेढावकर
तानाजीराव वाडकर
येसाजीराव वाडकर

लाल देशमुख सुभा मामले मजकूर

नारो रघुनाथ मुकादम मुताळीक सावरकर

**देसक कर्यात चिपुळीण**

महमदजी देसाई
हरी कृष्ण कदीम—देशकुलकर्णी
तुकसटे माहाजन
अंतो परशराम व निळो नरसी पतकी कदीम
श्रावणसेट सेव्हे
राघो विश्वनाथ जानीव देशकुलकर्णी दि॥
त्रिंबकरावजी
गोविंद रघुनाथ निघावन कसबे मजकूर
गंगाधर हरी

**उदमी कसबे मजकूर**

तिमाजी नाईक देऊसकर
नारोबा नाईक साखरे.
गणो आबाजी
त्रिंबक नाइक चिखले
नारोबा खोरगडे
परशराम कमोव्हे

**बकाल कसबे मजकूर**

लखसेट चवधरी
गोखसेट वाडकर
बालसेट वाडकर
जैतसेट माहांकाळ

गंगाजीराव तिवरेकर — धारोजीराव तिवरेकर
हसाजीराव पालाडे व बावाजीराव पालाडे — रायाजीराव व रामाजीराव अडरेकर
भानोजीराव ठेरूकर — सूर्याजीराव नादीवीसकर
सूर्याजीराव वोवलीकर — तानाजीराव रुद्राजीराव कादवडकर
रत्नोजी कुचेकर धणगर — संताजी लालगा धणगर

कृष्णाजी इंगवला व रामजी इंगवला वस्ती दलवठणे

भिका तेली कसबे मजकूर

कानसेट मेहतर सिंपी कसबे मजकूर

नीला व धारा परीट कसबे मजकूर

तेज माहाला हजाम व राम माहाला हजाम

जोग सालवी व बाजे कुंभार

पिला बहिरवकर गुरव

### ताफे जमाती

हसाजी सणगा — अलजी देसाई

### ताफे कासार

भीकसेट कासार — बालसेट कासार
कृष्णसेट सोनार

### ताफे गौवली

सखाऊ मेहतर — हरगौवली ठसाला

### ताफे साली

संभु ताब्या — विठोजी कावली
तुकसेट बेलकरी

### ताफे साटे

आबाजी मेहतर — इसुबजी मेहतर

### ठाणगे ता। मजकूर

सुडकोजी पडवल — माहाद लाडू

### डांग्ये जमाती चवधरी मजकूर

कानोजी डांग्या — यलोजी डांग्या
पिला टावरी कसबे मजकूर
लखमोजी गुरव केदारकर
संभा ह्मार कसबे मजकूर

जाहाला माहाजर ऐसा जें बकोजी घाटोरा व मानाजी घाटोरा वस्ती मौजे दलवटणे तां। मजकूर हाली वस्ती मौजे सिंपी ता। मलवडी अगरवादी दादजी बिन तुकोजी सावलकर व बाजी सावलकर वस्ती आधली ता। मलवडी पछमवादी यां उभयतामध्ये पेठ धणगराची ता। मजकुरी येत त्यांचे वडील गावडेपणाचा वेव्हार लागला ह्मणौन भांडत तां। मजकुरी आले गोतामध्ये मनसुबीस उभे राहिले बकोजी घाटोरा व मानाजी घाटोरा हे दोघे जण राजश्री गणेश माहादेव हवालदार ता। मजकूर यां जवल

येऊन उभें राहिले त्याही गोत मेळऊन हरदुजणाच्या तकरीरा घेतल्या छ २० माहे रज्यब

बकाजी घाटोरा व मानाजी घाटोरा अग्रवादी याणे तकरीद केली की ता। मजकूरचे पेठेचे गावडेपण पुरातन आपले चालत आले ऐशासी माहाराज राजश्री कैलासवासी छत्रपती स्वामीची नवी काबिजात जाली ते समई केशव सेट सेव्ये ता। मजकूर गाव टाकून कराडास मेले ते समई आपला बाप पदाजी घाटोरा सेव्ये बाहेर पडले ह्मणौन घाटा वरी गेला तेथे पदाजी घाटोरा मरोन गेला आपण लाहाण होतो कोकणात यावयास फावले नाही वरकड धणगर पेठेस येत होते त्यामध्ये तुकोजी सावळकर वडीलपणाचे पान घेऊ लागला हे वर्तमान आपणास कळले त्यासी आपण हि पोख्ता जाहालो मग आपण हि दळवटणेयासी आलो तुकोजी सावळकर याची पेठ आली फरोक्त जाहाल्या वर घाटा वर जाता दळवटणे येथे भेटला तेथे हटकिला कीं आपले

दादजी सावळकर व बाजी सावळकर पछमवादी यांणी तकरीर केली ऐसी जे पेंठ मजकूरचे वडीलकी गावडेपण आपले पिढी दर पिढी चालत आले पिढी

१ राघोजी
१ गोयाजी
१ सिरसोजी
१ दादजी
१ तुकोजी
१ हाली दादजी
६

येणे प्रमाणे आपले वडीलपण पिढी दर पिढी चालत आले आहे मध्ये बकोजी घाटोरा याणे आपला बाप तुकोजी या सवे दळवटणेयात कथला करून माणकोजी जामदार मौजे मजकुरी होता त्या जवळ आपले बापास नेऊन बोलिला की घाटोरे दळवटणेयात राहातात आणि तुह्मी येऊन यासि न भेटता जाता येता वडीलकीचे पान घेता ह्मणौन हटकिले त्या वरी

वडीलपणाचे पान का घेतोस ऐसे बोलिलो त्यास वाद सांगो लागला की मग माणकोजी जामदार या जवल उभा राहोन तुकोजीस आणविले त्याणे हरदुजणाचा कथला ऐकोन त्याणे सांगितले की तुकोजीस पान घ्यावयास निसबत नाही घाटोरीयानी वडील-पणाचे पान घ्यावे ऐसे केलेयां उपरी पदाजी सावलकर याणे आपल्या पिढ्या सांगितल्या त्या लटक्या याचा आजा दादजी सावलकर वरकड धणगर येतात ते जातीने येऊ लागले त्या मागे सावलकराचे कोण्ही येत नव्हते सांप्रत वडीलपणाचे पान घेतात हे तकरीर सही

हरदुजणांचा वाद जाहाला पेंठ कोणां तागायत चालत्ये आणि दलवठणे-यात वस्ती कधी हें.........जातीचा करीणा बोलणे जाहाले त्या वरून त्याणे घाटोरीयास लटके केले आपले बापास सांगितलें कीं तू जैसी पेठ घेऊन येतोस तेसी येत जात जाणें त्या उपरी आपणां सवे कोण्ही कटकट केली नाही अगर दुसरा कोणी पेठेस आला नाही पहिल्या पासूनं चालत आलें आहे तैसे च चालवीत आहे सांप्रत हाली बाकोजी व मानाजी घाटोरा कथलियास उभा राहिला घाटा वरी दोन तीन स्थली मन-सुभीस उभा राहिला परंतु घांटोरा समजे ना हाली येथे आला आहे हे तकरीर सही

येणेप्रमाणे तकरीरा लिहून दिल्या त्या उपरी हरदुजणास गोताने पुसिले की घाटा वरून दोन तीन स्थलीहून फिरत आलेत या उपरी हे स्थलींची मनसुभी मानत असेल तर मांन्य–पत्रें लिहून देणें त्या उपरी हरदुजण स्थलास मान्य होऊन राजीनामे लिहून दिल्हे कीं चिपुलिणचे स्थली मनसुभी निवडेल त्या प्रमाणें राजी जो न ऐके कथला करील तो गोताचा व दिवाणचा अन्यांई ह्मणौन हरदुजणानी राजीनामे लिहून दिल्हे दुसरे दिवसीं मनसुभीस गोत मिलालें मनसुभीस हरदुजण वादी उभे राहिले मनसुभी मुलें वृध वृध साक्ष मनास आणिली

तुकसेट कराडकर बेलकरी कसबे जोसी उपाध्ये घुमण वतनदार

मजकूर उमर वर्षे ७०।७५ हा बोलिला की बाकोजी वाटोरा व मानाजी घाटोरा याचा बाप पदाजी घाटोरा यासी सेटीनें वडीलकीचे पान दिल्हे इतके ठाउकें आहे परंतु भोगवटा का राहिला हे कलत नसे ह्मणौन बोलिला

याकुबजी जमाती व कानोजी डांग्या उमर वर्षे ६०।६९ हे बोलिले की सावलकर पेठ घेऊन येतात पान सावलकरांस दिवाण देतें ह्मणौन हरदुजण बोलिले

वीठसेट सेव्या बोलिला कीं आपण घटोरियाची गावडकी ऐसी ऐकिली आहे ह्मणौन बोलिला

अंताजी राव मोकासाई मौजे पेटाबे व रायाजी राव मोकासाई अडिरेकर व बाजे मोकासाइ बोलिले कीं घाटोरे ठावके नाही सावलकर पेठ घेऊन येतात हे ठावके आहे

यासी पुसिले तें बोलिले की हा दिवानगीचा विचार आपणास न कले परंतु बालाघाटी धणगर येतात त्याही आपल्या वडीलास धर्मादावपत्र दिल्हे होतें तें मनास आणून सांगों त्या वरून पत्रें आणिलीं तेथे मकसूदपत्र बनाम वो नरजोसी बिन रघुनाथ जोसी सुा इहिदे आर्बैन अलफ तेथे सिरसोजी व सुभानजी व राघोजी व कालोजी व समस्त धणगर शेकीन आंधालि व सिदी व बाजे मुकाम आइदे पेठ मजकूर लिहून दिल्हे की भट गोसावी प्रतिवर्सी बिराडास येऊन तिथी वार नक्षत्र सांगतात ह्मणौन कांबलियांच्या नगास ८३ ती रुका बुजरूक धर्मादाव करून दिल्हा त्या वरी निशानी

| | |
|---|---|
| सिरसोजी | राघोजी |
| भानजी | कालोजी |
| लाहाजी | मालजी |
| दादजी | संभाजी |
| जावजी मगर | खंडोजी |
| बालजी गावडा | तुकोजी |
| खंडोजी इक | |
| रत्नोजी | |
| ह्मकोजी | |

कुमाजी

मालजी मगर

बावाजी पिंगला

वीठ गांवडा

दलवठणेकर